महाराष्ट्र शासन

<u>तात्काळ/कालमर्यादा</u>

क्रमांक : संकीर्ण-२००८/(२१०/०८)/समन्वय कक्ष
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ मे,२००८

प्रति,
१) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) शिक्षण संचालक (प्रौढ), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे.
५) संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
६) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ (राज्य मंडळ), पुणे.
७) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे.
८) संचालक, राज्य शैक्षणिक तंत्रज्ञान संस्था, 'बालचित्रवाणी' आगरकर मार्ग, पुणे.
९) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, जवाहर बालभवन, चर्नीरोड, मुंबई.
१०) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (निपा), जिल्हा परिषद मल्टीपरपज हायस्कूल परिसर, भडकल गेट, औरंगाबाद.
११) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती अधिकारी व <u>अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक लावण्याबाबत.</u>

उपरोक्त विषयाबाबतचे सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. अहत-१००८/प्र.क्र.१८/०८/११-अ, दिनांक १५ मे,२००८ चे कृपया अवलोकन व्हावे. (परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.)

२. सदर परिपत्रकामध्ये दिलेल्या सूचनानुसार आपल्या कार्यालयातील तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयाबाबतची माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या नियम ४ खाली आवश्यक ठरविण्यात आलेली शासकीय कार्यालयाबाबतची १७ मुद्दयांबाबतची माहिती शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्याची कार्यवाही तातडीने करण्यात यावी. तसेच ही माहिती वरचेवर अद्ययावत करण्यात यावी. तसेच आपल्या कार्यालयात व आपल्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांमध्ये माहिती अधिकारी अथवा अपिलीय अधिकारी यांच्या नावाचे फलक लावण्याबाबतची कार्यवाही देखील तातडीने करण्यात यावी. उपरोक्त कार्यवाही पूर्ण करण्यासाठी तसेच माहिती वेळोवेळी अद्ययावत केली

जाईल हे पाहण्यासाठी आपल्या कार्यालयात तसेच आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयात एक नोडल ऑफिसर नेमण्यात यावा. याबाबतचे आदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास पाठविण्यात यावा.

सदरहू आदेश महाराष्ट्र शासनाच्या संकते स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २००८०५२२१२४२१९००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( सरिता दि. जिरगाळे )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत, उपसचिव (समन्वय) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

२. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग खुद्द येथील उपरोक्त मुद्दयांबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यासाठी तसेच माहिती वेळोवेळी अद्ययावत केली जाईल हे पाहण्यासाठी उपसचिव (समन्वय यांची 'नोडल अधिकारी' म्हणून नेमणूक करण्यात येत आहे.